# विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१,

१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.

दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ फॅक्स नं.- ०२०- २६१२२२१७

ई मेल आय डी क्र. dydpune @ gmail.com वेब साईट- www.dydepune .com


**अत्यंत महत्त्वाचे** जा.क्र.शिउसं/उमाशि-२/वैयक्तिक मान्यता/२०१६/

**ई-मेल** दिनांक :- १०.०५.२०१६ 19 MAY 2016

प्रति,

प्राचार्य/प्राचार्या,
सर्व कनिष्ठ महाविद्यालय/ उच्च माध्यमिक/
वरिष्ठ महाविद्यालय सलग्न कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**विषय :- सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षातील अंशकालीन (अर्धवेळ/प्र.घ.ता.) तत्वावरील शिक्षकांचे वैयक्तिक मान्यतेबाबत.**

**संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र दि. १०.०५.२०१६**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, पुणे विभागाची सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाकरिता उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांची संच मान्यता ऑफलाईन पध्दतीने करण्यात आलेली आहे. संच मान्यतेमधील मंजुर कार्यभारानुसार ज्या कनिष्ठ महाविद्यालयात अर्धवेळ/प्र.घ.ता. पदे मंजुर झालेली आहेत अशा सर्व मंजुर पदावरील शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता देण्यासाठीचे शिबीर खालील प्रमाणे जिल्हा निहाय करण्यात आलेले आहे.

सदर वेळापत्रकाप्रमाणे आपण आपल्या जिल्हयातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयातील अर्धवेळ/प्र.घ.ता. पदावरील शिक्षकांच्या मान्यतेबाबतचा प्रस्ताव दिलेल्या दिनांकास घेवुन वेळेवर उपस्थित रहावे.

वैयक्तिक मान्यतेसाठी खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करण्यात यावीत.

१. शैक्षणिक वर्ष २०१३-१४ व २०१५-१६ ची संच मान्यतेची छायांकित प्रत

२. शिक्षकांच्या नियुक्तीबाबत संस्था ठराव, नेमणूक आदेश, रुजु अहवाल, शै.अर्हता प्रती (इ.१० वी व १२ वी गुणपत्रीका सोडुन) जातीचा दाखला/जात पडताळणी प्रमाणपत्र,

३. सदरचे शिक्षक मान्यता शिबीर हे फक्त अंशकालीक (अर्धवेळ व प्र.घ.ता) यावरील नियुक्त शिक्षकांच्या मान्यतेबाबतच असल्यामुळे पुर्णवेळ शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव सदर शिबीरात स्विकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

४. ज्या अर्धवेळ/प्र.घ.ता. वरील शिक्षकांना शैक्षणिक वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ या कार्यालयाने मान्यता दिलेली आहे अशा शिक्षकांची पुर्ननियुक्ती शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये केलेली असल्यास त्यांच्या मागील वर्षाच्या वैयक्तिक मान्यता प्रती प्रस्तावासोबत सादर कराव्यात.

५. शिबीर ठिकाणी शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव दु. २ वाजेपर्यंतच स्विकारले जातील.

| अ. क्र. | जिल्हयाचे नांव | तालुके | कालावधी | शिबीराचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | **अहमदनगर** | नेवासा, कोपरगांव, श्रीरामपूर, राहाता, अकोले | २३.०५.२०१६ | पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर |
| | | संगमनेर, राहुरी, शेवगांव, पाथर्डी, पारनेर, | २४.०५.२०१६ | |
| | | जामखेड, श्रीगोंदा, कर्जत, अहमदनगर (शहर) | २५.०५.२०१६ | |
| २ | सोलापूर | सोलापूर (दक्षिण) (उत्तर), सोलापूर (शहर), अक्कलकोट, माढा, | २६.०५.२०१६ | सदाशिवराव माने विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, अकलुज |
| | | करमाळा, बार्शी, सांगोला, मोहोळ, | २७.०५.२०१६ | |
| | | मंगळवेढा, पंढरपूर, माळशिरस | २८.०५.२०१६ | |

| अ. क्र. | जिल्हयाचे नांव | तालुके | कालावधी | शिबीराचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| ३ | पुणे | भोर, वेल्हा , बारामती, इंदापूर, पुरंदर, दौंड | ३०.०५.२०१६ | एस व्ही युनियनं हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, रास्ता पेठ पुणे |
| | | खेड, आंबेगांव, जुन्नर, शिरुर, मावळ, पिंपरी चिंचवड | ३१.०५.२०१६ | |
| | | हवेली, पुणे (शहर) , | ०१.०६.२०१६ | |
| ४ | पुणे/अहमदनगर /सोलापूर | पुणे/अहमदनगर/सोलापूर (उर्वरित सर्व) | ०२.०६.२०१६ | |

उपरोक्त प्रमाणे दिलेल्या वेळापत्रकानुसार अंशकालीक शिक्षक मान्यता शिबीरास उपस्थित रहावे. सदर शिबीरात प्रस्ताव सादर करुन मान्यता घेतल्या नाहीत संबधित शिक्षकांच्या मान्यता कार्यालय स्तरावर देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. व याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य यांची राहील.

(रामचंद्र जाधव)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी :-**

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. अहमदनगर/पुणे/सोलापूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे वैयक्तिक मान्यता शिबीराबाबतची माहिती आपल्या जिल्हयातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना आपल्यास्तरावरुन कळविण्यात यावे.